## प्रकरण दुसरे

# घटनात्मक आकृतीबंध

## (Constitutional Framework)

### अ. मूलभूत हक्क (Fundamental Rights) :-

आधुनिक राज्य हे 'पोलिस राज्य' म्हणून नाही तर 'कल्याणकारी राज्य' म्हणून ओळखले जाते. आधुनिक राज्यात मूलभूत हक्कांना अधिक महत्त्व प्राप्त झालेले असते. सध्याच्या काळात तर राज्यांचा दर्जाच त्या राज्यातील नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारावरुन ठरतो. प्रो. लास्की म्हणतात की, "नागरिकांना मिळत असलेल्या हक्कावरुनच त्या राज्याचे स्वरुप निश्चित होत असते." म्हणून आज जगातील बहुतांश देशांनी आपल्या राज्यघटनेतच मूलभूत हक्कांची तरतूद केलेली आहे. सर्व प्रथम संयुक्त राज्य अमेरिकेच्या घटनेत मूलभूत हक्कांची तरतूद केल्याचे दिसून येते.

मूलभूत अधिकार हा भारतीय राज्यघटनेचा 'आत्मा' आहे असे ग्रॅनव्हिल ऑस्टिन म्हणतात या वरूनच हक्कांचे महत्त्व लक्षात येते. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने मूलभूत हक्क महत्वाचे असतात.नागरिकांना आपले जीवन चांगले जगता यावे यासाठीच मूलभूत हक्क देणे आवश्यक आहे. त्याच बरोबर राज्याचे अस्तित्व टिकविण्यासाठीही मूलभूत अधिकाराची आवश्यकता असते.जर नागरिकांना मूलभूत हक्क दिले नाही तर त्यांच्यात असंतोष निर्माण होऊन क्रांती होण्याची शक्यता असते. म्हणून नागरिकांना मूलभूत हक्क देणे आवश्यक आहे.

### मूलभूत हक्कांचा इतिहास :-

मूलभूत हक्काचा विचार सर्व प्रथम इंग्लंडमध्ये सुरु झाला. इंग्लंडच्या जनतेने राजाकडे मूलभूत हक्काची मागणी 'मॅग्नाचार्ट' द्वारे इ.स. १२१५ मध्ये



केली आणि १६२८ पासून इंग्लंडमध्ये अधिकाराची परंपराच निर्माण झाली. फ्रेंच क्रांतिकारकांनीही राष्ट्रीय सभेत १७८९ साली मानवाच्या हक्कांची घोषणा केली. संयुक्त राज्य अमेरिकेतही मूलभूत अधिकाराची मागणी एका विधेयकाद्वारे करण्यात आली. नंतर 'Bill of Rights' चा अमेरिकेच्या घटनेत समावेश करण्यात आला. १९३६ साली रशियात स्टॅलिनने आपल्या घटनेत मूलभूत अधिकारांचा समावेश केला. जर्मनीच्या विमर राज्यघटनेतही 'मूलभूत हक्क आणि कर्तव्ये' याचा समावेश करण्यात आला. तसेच आयर्लंड, स्विस या देशाच्याही राज्यघटनेत मूलभूत हक्काची तरतूद केलेली आढळते.

भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला असला तरी स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे स्वातंत्र्याच्या अंदोलनातच मूलभूत हक्काची मागणी जोर धरत होती. म्हणजे १९२८ साली प्रथम सर्व पक्षीय संमेलनात मूलभूत हक्काची मागणी करण्यात आली. मोतीलाल नेहरूच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीनेही भारतीय नागरिकांना आजपर्यंत नाकारण्यात आलेले मूलभूत हक्क हवेत अशी मागणी केली त्यास 'नेहरु अहवाल'म्हणून ओळखले जाते. गोलमेज परिषदेमधून ही भारतीय नेत्यांनी आपल्या मागण्यात मूलभूत हक्काची मागणी केली. कराची तेथील ठरावात पून्हा मूलभूत हक्काचा पुनरुच्चार झाला. परंतु ब्रिटिशांनी आपल्या या हक्काच्या मागणीला विरोध केला व १९३५ च्या कायद्यात मूलभूत हक्कांचा विचार केला नाही. १९४० च्या दशकात जागतिक पातळीवर मानवी हक्कांची जाणीव निर्माण झाली. 'ॲटलांटीक चार्टर', 'युनोचार्टर', 'मानवी हक्काचा जाहिरनामा' इत्यादीची निर्मिती याच काळात झाली. १९४५ साली सादर केलेल्या सप्रु समितीनेही आपल्या अहवालात मूलभूत हक्काची आवश्यकता स्पष्ट केली होती. १९४६ मध्ये मात्र ब्रिटिशांनी आगामी घटनेत मूलभूत हक्काची तरतूद करण्याचे मान्य केले. भारतीय घटनाकार अमेरिकेच्या घटनेतील 'Bill of Rights' व फ्रॅन्समधील 'मानवी हक्काची सनद' यावर फारच आकृष्ट झालेले होते. आपल्या मूलभूत हक्कावर जपान, ब्रम्हदेश या देशाच्या घटनेतील मूलभूत हक्काचाही प्रभाव जाणवतो कारण या देशातील परिस्थिती व आपली परिस्थिती जवळपास सारखीच होती.

मूलभूत हक्का विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, भारताच्या राज्यघटनेतील मूलभूत हक्काचे स्वरुप दुहेरी आहे. पहिले असे की, मूलभूत हक्कावर नागरिकांना दावा करता यावा म्हणून त्यांना घटनेत स्थान देण्यात आले



Scanned with OKEN Scanner

आहे व दुसरे म्हणजे कोणत्याही प्रकारच्या सत्तेवर मूलभूत हक्काचे बंधन असावे म्हणून मूलभूत हक्काना घटनेत सामावून घेतले आहे. भविष्यकाळात सत्तारुढ होणाऱ्या सरकारने मनमानी कारभार करुन घटना बदल करु नये म्हणून त्या बाबतीत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला दिला आहे.

सुदृढ लोकशाही करता मूलभूत अधिकार सर्वांनाच आवश्यक वाटू लागले.शारीरिक, मानसिक व बौध्दिक वाढीकरीता ती आवश्यक बाब ठरली. राजकीयक्षेत्राबरोबरच सामाजिक, धार्मिक आणि नागरी आयुष्यात स्वातंत्र्य आले. लोकशाही ही जीवन प्रणाली होण्यासाठी नागरिकांना हक्क मिळणे क्रमप्राप्त झाले. याचीच परिणीती म्हणजे भारतीय घटनेत मूलभूत हक्काचा समावेश केला गेला.

भारतीय घटनेच्या तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्काची तरतूद केली आहे.

कलम १२ मध्ये राज्याची व्याख्या करण्यात आली. भारत सरकार, घटक सरकारे, सर्व स्थानिक स्वशासन संस्था, संसद, राज्याचे कायदेमंडळ आणि भारतीय भूप्रदेशात सरकारच्या अधिकारक्षेत्रात मोडणाऱ्या सर्व संस्थांचा यात समावेश असेल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

कलम १३ मध्ये असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, मूलभूत अधिकाराच्या विरोधात जाणारा कायदा बेकायदेशीर ठरेल. घटनात्मक कायदा व साधा कायदा यात घटनात्मक कायदा श्रेष्ठ ठरेल.

जेव्हा राज्यघटना अंमलात आली त्यावेळी भारताच्या राज्यघटनेने नागरिकांना सात अधिकार दिले होते परंतु सध्या भारतीय नागरिकांकरिता सहा मूलभूत अधिकार राहिले आहेत. ४४ व्या घटना दुरुस्तीने मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकार राहिलेला नसून तो आता कायदेशीर अधिकार झालेला आहे. या घटना दुरुस्तीने घटनेतील कलम १९ (च) व कलम ३१ ही मालमत्तेच्या अधिकारासंबंधीची कलमे वगळण्यात आली आहेत.

राज्यघटनेद्वारे भारतीय नागरिकांना मिळालेल्या सहा मूलभूत हक्कांचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

१) समानतेचा हक्क (Right to Equality) कलम १४ ते १८
२) स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom) कलम १९ ते २२
३) शोषणाविरुध्द हक्क (Right Against Exploitation) कलम २३ ते २४



४) धर्मस्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom of Religion) कलम २५ ते २८
५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (Cultural and Educational Rights) कलम २९ ते ३०
६) घटनात्मक उपाय योजनेचा हक्क (Right to Constitutional Remedies) कलम ३२ ते ३५

**१) समानतेचा हक्क (Right to Equality) कलम १४ ते १८.**

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील कलम १४ ते १८ मध्ये समतेच्या हक्काची तरतूद करण्यात आली आहे. लोकशाही शासनव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या देशात समतेच्या हक्काला अत्यंत महत्त्व देण्यात येते, कारण त्या देशात सामाजिक व राजकीय जीवनात समता प्रस्थापित झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. भारताच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास येथील समाज जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रात कमालीची विषमता आढळून येते. म्हणूनच भारतीय राज्यघटनेने समतेच्या हक्काद्वारे सर्व नागरिकात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. समतेच्या हक्कात पुढील बाबींचा समावेश होतो.

**अ) कायद्यापुढे समानता :-**

राज्यघटनेतील कलम १४ अन्वये राज्य, भारतीय प्रदेशात कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या बाबतीत समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारू शकणार नाही.

कायद्याच्या बाबतीत समानता याचा अर्थ असा, की कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नसून राज्याचे कायदे सर्व व्यक्तींना सारखेच लागू होतील. तसेच कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान असल्यामुळे कायद्याची अंमलबजावणी करताना राज्य व्यक्ती-व्यक्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करणार नाही. परंतु काही व्यक्तींना कलम ३६१ नुसार अधिक संरक्षण दिले जाते. उदा. राष्ट्रपती, राज्यपाल आदी. पण त्यामुळे समानतेच्या तत्त्वाला बाधा येत नाही.

**ब) भेदभाव करण्यास मनाई :-**

राज्यघटनेतील कलम १५ अन्वये राज्य, केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

कोणत्याही नागरिकाला वरील बाबींच्या आधारे दुकाने, सार्वजनिक



Scanned with OKEN Scanner

उपाहारगृहे, भोजनालये, सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे अशा ठिकाणी जाण्यास किंवा पूर्णत: अथवा अंशत: राज्याच्या अनुदानातून किंवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरिता समर्पित अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते, सार्वजनिक विश्रांतीची ठिकाणे आदींचा वापर करण्यास प्रतिबंध केला जाणार नाही. परंतु स्त्रीया व बालके यांच्यासाठी किंवा सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरीता खास तरतूदी करण्याचा राज्याला अधिकार असेल.

**क) समान संधी :-**

राज्यघटनेच्या कलम १६ अन्वये अशी तरतूद केलेली आहे, की राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावर नियुक्ती करण्याबाबत सर्व नागरिकास समान संधी असेल.

कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवास या कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतीही नोकरी किंवा पद प्राप्त करण्यासाठी अपात्र ठरविले जाणार नाही. याचाच अर्थ असा, की भारतीय राज्यघटनेनी सार्वजनिक पद प्राप्तीबाबत किंवा नोकरीबाबत सर्व नागरिकांना समान संधी दिली आहे.

परंतु या हक्काबाबत काही अपवादही केले आहेत. राज्याच्या नियंत्रणाखालील काही नोकऱ्यासाठी व्यक्ती त्या राज्याची रहिवाशी असावी अशी अट घालता येते. तसेच मागासवर्गीय प्रवर्गांना सरकारी नोकऱ्यात पर्याप्त प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून काही जागा त्यांच्यासाठी राखीव ठेवता येतात. याशिवाय एखाद्या धर्माच्या संस्थेतील नोकऱ्या त्याच धर्माच्या लोकांना मिळण्यासंबंधी तरतूद करता येते.

**ड) अस्पृश्यता नष्ट करणे :-**

राज्यघटनेतील कलम १७ अन्वये अस्पृश्यता पाळण्यास बंदी घालण्यात आली असून अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविला आहे. तिचे पालन करणाऱ्यास कायद्याने शिक्षा केली जाईल असे स्पष्ट केले आहे. भारतीय राज्यघटनेचे सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट असल्यामुळे अस्पृश्यता नष्ट केली आहे. याच अनुषंगाने भारतीय संसदेनी १९५५ साली अस्पृश्यता निवारण कायदा संमत करून अस्पृश्यता पाळणाऱ्या व्यक्तीस दंड व कारावासाच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे. यामुळे सामाजिक समता प्रस्थापित करणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याचे दिसून येते.



**इ) पदव्यांची समाप्ती :-**

राज्यघटनेच्या कलम १८ अन्वये पदव्या देण्यास राज्यावर बंदी घातली आहे. त्यामुळे राज्य आता पदव्या देऊ शकत नाही. पदव्यांच्या प्रथेमुळे व्यक्ती-व्यक्तीत कृत्रिम भेदभाव केला जातो. अशाप्रकारचा भेदभाव करणे समतेच्या तत्त्वाच्या विरोधी असल्याने या प्रथेवर बंदी घातलेली आहे. त्यामुळे आता सेवाविषयक अथवा विद्याविषयक मान विशेष नसलेला कोणताही किताब राज्याकडून दिला जाणार नाही. तसेच भारताच्या कोणत्याही नागरिकाला परराष्ट्राकडून कोणताही किताब स्वीकारता येणार नाही. इतकेच नाही तर भारतीय नागरिक नसलेली व्यक्ती भारतातील लाभाचे पद धारण करीत असेल तर तिला देखील राष्ट्रपतीच्या संमतीशिवाय परकीय देशाकडून कोणतेही किताब स्वीकारता येणार नाहीत. मात्र लष्करी किंवा विद्वतादर्शक पुरस्कार देण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला आहे. सन १९५४ पासून भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री यासारखे पुरस्कार देण्याची प्रथा सुरू केली.

**२) स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom) कलम १९ ते २२.:-**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचा अधिकार नमूद करण्यात आला आहे.

कलम १९ अन्वये भारतीय नागरिकांना सहा प्रकारचे स्वातंत्र्याचे अधिकार देण्यात आले असून ते पुढीलप्रमाणे आहेत.

i) भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य (कलम १९ (१) क)
ii) शांततापूर्वक व विना शस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) ख)
iii) संस्था व संघटना बनविण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) ग)
iv) सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) घ)
v) भारतात कोठेही राहण्याचे किंवा वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) ड)
vi) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) छ)

**i) भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य (कलम १९ (१) क) :-**

राज्यघटनेनी भारतीय नागरिकाला भाषण करण्याचे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. यामुळे भारतीय नागरिक आपले विचार प्रकट करू शकतो.



Scanned with OKEN Scanner

विचारांची देवाण-घेवाण होते. सुदृढ लोकशाहीसाठी हे आवश्यक असते. मुद्रण स्वातंत्र्याच्या हक्काचा स्वतंत्र घटनेत उल्लेख नाही. परंतु भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कात त्याचा समावेश होतो. यास डॉ. आंबेडकरांनीही दुजोरा दिला. त्यांच्या मते, वृत्तपत्राचे संपादक हे भारतीय नागरिक आहेत. त्यामुळे त्यांना आपले विचार वृत्तपत्राद्वारे प्रकट करण्याचे स्वातंत्र्य आहेच. तेव्हा वृत्तपत्र स्वातंत्र्याचा स्वतंत्र उल्लेख करण्याची आवश्यकता नाही. मूळ राज्यघटनेत या अधिकाराचे स्वरूप व्यापक होते. परंतु १९५१ साली पहिल्या घटनादुरूस्ती कायद्याने भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने वाढविण्यात आलीत. आता देशाचे सार्वभौमत्व, एकात्मता, देशाची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, यांच्या हितासाठी भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याचा अधिकार सरकारला प्राप्त झाला आहे. तसेच न्यायालयाचा अपमान, अब्रुनुकसान किंवा गुन्हयास प्रवृत्त करणारे भाषण करण्यास योग्य ती बंधने घालण्याचा अधिकार सरकारला असेल.

**ii) शांततापूर्वक व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) ख) :-**

लोकशाहीत आपले विचार दुसऱ्यांना पटवून देण्यासाठी सभा भरविणे (एकत्र जमणे) आवश्यक असते. म्हणून हा अधिकार लोकशाहीच्या यशासाठी महत्त्वपूर्ण अधिकार आहे. या अधिकारातच मिरवणूका काढण्याच्या अधिकाराचा देखील समावेश होतो. अर्थात सभा शस्त्र न बाळगता शांततेने पार पाडणे आवश्यक असते.

हा अधिकार देखील अमर्याद नाही सार्वजनिक सुव्यवस्था, सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय एकता यांना धोका पोहचणार नाही या दृष्टिने सभा स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला आहे.

**iii) संस्था वा संघटना बनविण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) ग) :-**

व्यक्तीविकास व समाज विकास या दृष्टीने विचार केल्यास संस्था किंवा संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य नागरिकांना देणे योग्य वाटते. संस्था किंवा संघटना यात राजकीय पक्ष, सांस्कृतिक मंडळे, कामगार संघटना, भागीदारी संस्था यांचा समावेश होतो. म्हणूनच भारतीय राज्यघटनेनी नागरिकांना संस्था वा संघटना स्थापन करण्याचा अधिकार दिला आहे. परंतु हा अधिकार देखील मर्यादित असून सरकार सार्वजनिक सुव्यवस्था व नीतिमत्ता या दृष्टिने या अधिकारावर वाजवी ती बंधने घालू शकते.



**iv) सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) घ) :-**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१) (घ) नुसार भारतीय नागरिकांना भारताच्या प्रदेशात अनिर्बंध संचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. अशा स्वातंत्र्यामुळे व्यक्तिमत्व विकास होतो.

परंतु हा अधिकार देखील अमर्याद स्वरूपाचा नाही. कायद्याने स्थानबध्द केलेल्या व्यक्तिला भारतात कोठेही संचार करण्याचा अधिकार नसतो. तसेच संसर्गजन्य रोगाने पिडीत असलेल्या व्यक्तिच्या संचार स्वातंत्र्यावर बंधन घातले जाऊ शकते.

**v) भारतात कोठेही राहण्याचे किंवा वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य (कलम १९(१) ङ)**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (ङ) नुसार भारतातील नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. उदा. भारताच्या एखाद्या घटक राज्यात जन्मास आलेल्या व्यक्तीला अन्य घटक राज्यामध्ये जाऊन राहता येते व स्थायिक होता येते. या हक्कामुळे भारताची एकात्मता टिकून राहण्यास मदत होते असा सर्वोच्च न्यायालयाने गोपालन खटल्यात निर्णय दिला.

**vi) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचे स्वातंत्र्य (कलम १९ (१) छ :-**

भारतीय घटनेच्या कलम १९ (१) छ नुसार भारतीय नागरिकाला त्यांच्या आर्थिक विकासासाठी स्वेच्छेने कोणताही पेशा आचरण्याचे किंवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

हा अधिकार देखील मर्यादित स्वरूपाचा आहे. सरकार विशिष्ट व्यवसायासाठी विशिष्ट पात्रतेची अट घालू शकते. वैद्यकीय व्यवसाय करण्यापूर्वी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता प्राप्त करून वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नोंद करणे आवश्यक असते.

कलम १९ अन्वये नागरिकाला स्वातंत्र्याचे जे सहा हक्क दिलेली आहेत त्यांच्या संरक्षणासाठी कलम २०, २१ व २२ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

कलम २० मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की,

१. कोणत्याही व्यक्तीला तिने केलेले कृत्य अंमलात असलेल्या कायद्याविरूध्द असून ते गुन्हा म्हणून ठरविले गेले असेल तरच तिला शिक्षा होईल. तसेच तो अपराध करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली जी शिक्षा करता आली



Scanned with OKEN Scanner

असती त्यापेक्षा ती अधिक असणार नाही.

२. कोणत्याही व्यक्तीवर एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा खटला चालविला जाणार नाही व तिला शिक्षा दिली जाणार नाही.

३. कोणत्याही गुन्ह्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर स्वत: विरूध्द साक्षीदार होण्याची सक्ती केली जाणार नाही.

कलम २१ नुसार कायद्याने निश्चित केलेल्या कार्यपध्दती शिवाय कोणत्याही व्यक्तीस तिला जीवित किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही.

कलम २१ क नुसार राज्य, सहा ते चौदा वर्षे वयाच्या सर्व बालकासाठी राज्यास विधीद्वारा निर्धारित करता येईल. अशा रीतीने, मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतुद करील.

कलम २२ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की,

१. एखाद्या व्यक्तिस अटक केलेली असेल तर शक्य तितक्या लवकर तिला अटकेची कारणे कळविल्याशिवाय अटकेत ठेवता येणार नाही. शिवाय त्या व्यक्तीला आपल्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा व त्याच्याकडून बचाव करण्याचा हक्क तिला नाकारता येत नाही.

२. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला अटकेपासून चोवीस तासांच्या कालावधीत दंडाधिकाऱ्यापुढे हजर केले जाईल आणि दंडाधिकाऱ्याने प्राधिकृत केल्याशिवाय उक्त कालावधीनंतर अधिक काळ अटकेत ठेवता येणार नाही.

अर्थात या हक्काला दोन अपवाद आहेत.

१. अटक झालेली व्यक्ती परकीय शत्रू असल्यास

२. अटक झालेल्या व्यक्तीला प्रतिबंधात्मक स्थान बध्दता कायद्याखाली पकडले असल्यास वरील हक्कांचे संरक्षण मिळणार नाही. प्रतिबंधात्मक स्थानबध्दता कायद्याप्रमाणे एखाद्याव्यक्तीस दोन महिन्यापर्यंत स्थानबध्द करता येते. (विना चौकशी अटकेत ठेवता येते) म्हणजे त्या व्यक्तीवर रीतसर खटला न चालविता अटक करण्याची तरतूद आहे. या कायद्याचा उद्देश संबंधित व्यक्तीने काय केले यापेक्षा त्या व्यक्तीने काही गोष्टी करू नयेत यासाठी प्रतिबंध करणे असा आहे.

### ३) शोषणाविरुध्द हक्क (Right Against Exploitaion) कलम २३ ते २४ :-

भारतीय राज्यघटनेच्या कलम २३ व २४ मध्ये शोषणाविरूध्दचा हक्क



नमूद करण्यात आला आहे.

कलम २३ नुसार माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे. या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र गुन्हा असेल.

कलम २४ नुसार १४ वर्षाखालील मुलांना खाणी, कारखाने किंवा धोक्याच्या ठिकाणी नोकरीत अथवा कामावर लावले जाणार नाही.

परंतु, शासन यावर कायदाकरून योग्य ती बंधने घालू शकते. सार्वजनिक हिताच्या दृष्टिने सरकार लोकांकडून एखादे काम सक्तीने करवून घेऊ शकेल.

### ४) धर्मस्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom of Religon)

### कलम २५ ते २८ :-

कलम २५ अन्वये सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य यांना बाधा येणार नाही अशा रितीने भारतातील सर्व नागरिकांना आपल्या सद्सद्विवेक बुध्दीनुसार वागण्याचे आणि आपल्या धर्माचे पालन व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. परंतु सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य यासाठी सरकार धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा घालू शकते.

कलम २६ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे, की सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या अधीन राहून प्रत्येक धार्मिक संप्रदायास पुढील अधिकार असतील.

१. धार्मिक संस्था स्थापन करणे व त्या स्वखर्चाने चालविणे.

२. धार्मिक बाबतीत आपल्या व्यवहाराची व्यवस्था पाहणे.

३. जंगम व स्थावर संपत्ती मालकीची असणे व ती संपादन करणे.

४. कायद्यानुसार अशा संपत्तीचे प्रशासन करणे.

कलम २७ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे, की एखाद्या कराच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न एखाद्या धर्माच्या किंवा धार्मिक संप्रदाय संवर्धनासाठी, प्रसारासाठी खर्च करण्यात येणार असेल तर असा कर देण्याची कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जाणार नाही.

प्रत्येक धार्मिक संप्रदायाला स्वत:चा निधी उभारण्याची मूभा असली तरी असा निधी उभा करण्यासाठी कोणावरही सक्ती केली जाणार नाही अशी संविधानात तरतूद करण्यात आली आहे. यामुळे धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली संपत्ती



Scanned with OKEN Scanner

धार्मिक संस्थांना मिळू शकत नाही. तथापि एखादी व्यक्ती स्वखुषीने धार्मिक कार्यासाठी पैसे देऊ शकेल.

कलम २८ मध्ये असे नमूद केले आहे, की पूर्णपणे सरकारच्या अनुदानातून चालविल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थात कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

तथापि संस्थेच्या मूळ धोरणात धार्मिक शिक्षण देण्याच्या तरतूदी असतील तर ती संस्था धार्मिक शिक्षण देऊ शकेल. परंतु अशा धार्मिक शिक्षणाची, उपासनेची सक्ती कोणावरही करता येणार नाही. जर एखाद्या व्यक्तिने किंवा अशी व्यक्ती अज्ञान असल्यास तिच्या पालकाने आपली संमती दिल्यास धार्मिक शिक्षण देण्यास प्रतिबंध राहत नाही.

**५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (Cultural and Educational Right) कलम २९ ते ३० :-**

अल्पसंख्यांकांच्या हक्कासाठी भारतीय संविधानाने सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांची तरतूद कलम २९ व ३० मध्ये केली आहे. भारतीय संविधानाच्या २९ व्या कलमानुसार भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या नागरिकांच्या कोणत्याही गटाला स्वत:ची विभिन्न भाषा, लिपी किंवा संस्कृती असेल तर ती जतन करण्याचा त्यास अधिकार असेल. तसेच सरकारी अनुदानातून चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत केवळ धर्म, वंश, जात, भाषा या कारणावरून कोणत्याही नागरिकास प्रवेश नाकारला जाणार नाही.

कलम ३० अन्वये अल्पसंख्यांक समाजास धर्म किंवा भाषा या निकषावर शिक्षण संस्था स्थापन करता येतील व त्यांचे प्रशासन करता येईल. अशा शैक्षणिक संस्थास अल्पसंख्यांकाची संस्था म्हणून सहाय्य करताना राज्याला भेदभाव करता येणार नाही.

**६) घटनात्मक उपाययोजनेचा हक्क :-** ( Right to Consititutional Remedies) कलम - ३२ ते ३५. :-

घटनेतील कलम ३२ ते ३५ मध्ये घटनात्मक उपाययोजनेच्या हक्काचे विवेचन करण्यात आलेले आहे. जर नागरिकांना दिलेल्या हक्कांचा वापर करता येत नसेल तर ते हक्क निरूपयोगी होत. म्हणून या हक्काचा भंग झाल्यास कोणती उपाय योजना केली आहे त्यालाच 'घटनात्मक उपायांचा हक्क' म्हणतात.



या हक्कामुळेच मूलभूत हक्कास खरे स्वरुप प्राप्त झाले आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या हक्काचे वर्णन 'राज्य घटनेचा आत्मा व हृदय' (The heart and soul of the Constitution) अशा शब्दात केले आहे. जर नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा भंग झाल्यास नागरिकांना उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. अर्जाच्या आधारेच न्यायालयांना वेगवेगळ्या आज्ञा देण्याचा अधिकार आहे.

कलम ३२ (१) नुसार मूलभूत हक्काच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाकडे ठराविक मार्गाचा अवलंब करून दाद मागण्याचा अधिकार देण्यात येईल. कलम ३२ (२) नुसार या हक्काच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालय आवश्यक ते आदेश, निर्देश किंवा रिट (writ) काढू शकेल. त्याचे स्वरुप बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, अधिकार पृच्छा, प्रतिषेध व उत्प्रेषण यापैकी जो आदेश उपयोगी असेल त्याद्वारे आपल्यावरील अन्याय दूर करता येईल.

कलम ३२ (३) नुसार सर्वोच्च न्यायालयाचे हे अधिकार संसद कायदाकरुन इतर न्यायालयाकडे कांही प्रमाणात कसलाही पक्षपात न करता सोपवू शकेल.

कलम ३२ (४) नुसार हे अधिकार काढून घेता येणारे नाहीत. त्यासाठी घटनेतच अशी तरतूद करावी लागेल.

कलम ३३ नुसार संसदेला कायदा करुन सैन्य दलातील व्यक्ती व सनदी सेवकांना हे अधिकार किती प्रमाणात व कसे दयावे हे ठरविता येईल. त्यांना बजावाव्या लागणाऱ्या कर्तव्यावर परिणाम होणार नाही यासाठी संसदेला कायदा करुन ठरविता येईल.

कलम ३४ नुसार संसद हे अधिकार देण्याचे थांबवू शकेल. उदा. जिथे मार्शल लॉ लागू केलेला आहे त्या भागापुरते हे अधिकार कांही काळासाठी काढून घेतले जातात.

कलम ३५ नुसार मूलभूत अधिकाराची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने संसद कायदे करु शकेल. हा अधिकार राज्य शासनाच्या कायदेमंडळास असणार नाही.

मूलभूत हक्काचा भंग झाल्यास नागरिक उच्च व सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतात. हक्क भंगाचे स्वरुप लक्षात घेऊन वेगवेगळे पाच प्रकारचे अर्ज नागरिकांना न्यायालयाकडे करता येतात. त्या अर्जाचा विचार करुन न्यायालय आदेश किंवा आज्ञा देतात. हे अर्ज खालील प्रमाणे आहेत.



Scanned with OKEN Scanner

### i) बंदी प्रत्यक्षीकरण :-

बेकायदेशीररीत्या एखादया व्यक्तीला जर अटक केली असेल तर हा अर्ज करावयाचा असतो. हा अर्ज अटकेत असलेली व्यक्ती व त्याच्या इतर कोणत्याही नातेवाईकाला, मित्राला करता येतो. या अर्जामुळे अटकेत असलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर उभे करण्यात येऊन अटकेची कारणे सादर करावीत असा आदेश न्यायालय संबंधीताना (सरकार असेल तर सरकार किंवा संस्था) देते. जर बेकायदेशीरपणे उपरोक्त व्यक्तीला अटक केली असेल व तसे न्यायालयात सिद्ध झाले तर संबंधीत व्यक्तीला मूक्त करण्याचे आदेश न्यायालय देते. यामुळे सरकार मनाला वाटेल त्यानुसार कोणालाही अटक करु शकणार नाही. अज्ञान मुले, पाल्य, पत्नी, वेडा माणूस किंवा गुलाम इत्यादींना कोणतीही व्यक्ती अटकेत ठेवू शकणार नाही. अपवाद परकीय शत्रु, राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक केलेल्या व्यक्ती व आणीबाणीच्या कालखंडात हा अर्ज करता येत नाही.

### ii) परमादेश :-

आपल्यावर झालेला अन्याय दूर करुन घेण्यासाठी या अर्जाचा उपयोग होतो. सरकार किंवा एखादी संस्था आपली कर्तव्ये पालन करीत नसल्यास व त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असल्यास ती व्यक्ती न्यायालयाकडे अर्ज करते. न्यायालये तो अर्ज स्वीकारून संबंधीताला कर्तव्याचे पालन करण्यास भाग पाडत असते. यालाच परमादेश असे म्हणतात. उदा. कारखान्यात काम करीत असताना कामगारास अपघात होऊन जखम झाल्यास फॅक्टरी ॲक्टनुसार नुकसान भरपाई दिली जाते. पण कधी शासन व खाजगी कंपनीचे मालक नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करीत असतात. अशा वेळेस या कायदयान्वये कामगारास परमादेशचा अर्ज करता येतो. न्यायाधिशास अर्ज ग्राह्य वाटल्यास संबंधीतास कर्तव्याचे पालन करावे असा आदेश किंवा आज्ञा न्यायालय देते.

### iii) अधिकार पृच्छा :-

एखादे सार्वजनिक पद भूषविण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता अंगी नसतांना जर कोणी ते पद ग्रहण केले असेल तर, "संबंधीत व्यक्तीला ते पद धारण करण्याचा अधिकार काय ?" अशी पृच्छा न्यायालयाकडे अर्ज करुन करता येते. मात्र अर्ज करणाऱ्यानी दोन अटी पूर्ण केल्या पाहिजेत. एक म्हणजे ज्या पदाच्या बावतीत वाद चालू आहे त्या पदाबावत त्याचे हित संबंध गुंतलेले असावेत आणि दुसरे म्हणजे ते पद कायम स्वरुपाचे असावे.



### iv) प्रतिषेध :-

एखाद्या खटल्याची सुनावणी कनिष्ठ दर्जाच्या न्यायालयापुढे चालू असेल व तो खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकार त्या न्यायालयास नसेल तर कनिष्ठ न्यायालयास सबब खटला चालविण्याचा अधिकार नाही म्हणून सदर खटल्याची सुनावणी तहकूब करावी असा अर्ज उच्च न्यायालयाकडे करता येतो. सबब खटला खरोखरच कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेरचा आहे असे वरिष्ठ न्यायालयास वाटल्यास वरिष्ठ न्यायालय त्या खटल्याची सुनावणी तावडतोब बंद व्हावी असा हुकूम देऊ शकते. सबब खटल्यात कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांचे हित संबंध गुंतलेले असतील, किंवा तो पूर्वगृह दूषित असेल अशा वेळी सुद्धा 'प्रतिषेध' अर्ज करता येतो. यामुळे वरिष्ठ न्यायालय प्रतिषेध लेख (Writ of Prohibition) देऊन खटल्याची सुनावणी तहकूब करु शकते. या तरतुदीमुळे न्यायाधिशांना आपल्या अधिकार क्षेत्रातच कार्य करण्यास भाग पाडता येते.

### v) उत्प्रेषण :-

कनिष्ठ न्यायालयापुढे चालू असलेला एखादा खटला वरिष्ठ न्यायालयापुढे चालविला जावा असा अर्ज करणे म्हणजे 'उत्प्रेषण' होय. हा अर्ज न्यायदानाच्या दृष्टीने करणे योग्य आहे असे वाटल्यास वरिष्ठ न्यायालय तसा हुकूम देऊ शकते. असा हुकूम दिल्यास संबंधीत खटल्याचे कागद पत्रे वरिष्ठ न्यायालयाकडे वर्ग होतात.

### मूलभूत हक्कांचे मूल्यमापन :-

भारतीय नागरिकांना घटनेनी जे मूलभूत अधिकार दिलेले आहेत त्यावर विविध प्रकारची टीका केली जाते. काहींच्या मते हे हक्क अपुरे आहेत. उदा. काम करण्याचा हक्क, विश्रांतीचा हक्क, याची भारतीय घटनेत नोंद नाही. काही देशाच्या घटनेत वरील हक्कांची नोंद करण्यात आलेली दिसून येते.

तसेच घटनेनी एकीकडे मूलभूत हक्क दिलेले आहेत तर दुसरीकडे त्यावर मर्यादा टाकलेल्या आहेत. त्यामुळेच काही टीकाकार मूलभूत हक्कांचे प्रकरण म्हणजे मूलभूत हक्कांवरील मर्यादा किंवा मर्यादासहित मूलभूत हक्क अशी उपहासात्मक टीका करतात.

नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मात्र घटनेतच काही तरतुदी अशा आहेत की हा प्रयत्न



Scanned with OKEN Scanner

यशस्वी करु शकत नाही. उदा. प्रतिबंधक स्थानबध्दता, आणीबाणी इ. काळात व्यक्तीस्वातंत्र्याच्या हक्कावर मर्यादा पडतात.

वरील टीका चुकीची आहे असे नाही; पण यामुळे मूलभूत हक्काचे प्रकरणच अनाठायी आहे असे म्हणता येणार नाही म्हणजे संपूर्ण देशावरच संकट आलेले असते तेंव्हा त्या संकट निवारणाला प्राधान्य देणे गरजेचे असते. आणीबाणीच्या काळातच फक्त घटनेतील १९ व्या कलमावर बंधने येतात तेही फक्त आणीबाणीच्या काळापुरते मर्यादीत असतात. घटनात्मक उपायाच्या हक्कावरही बंधने येतात. मात्र आणीबाणीच्या घोषणेतच तसा स्पष्ट उल्लेख असल्यास त्यावर आणीबाणीच्या काळापुरत्याच मर्यादा येतात. म्हणजे राष्ट्राच्या सुरक्षितेतच व्यक्तीची सुरक्षितता सामावलेली असते. म्हणूनच संकट काळात किंवा आणीबाणीच्या काळात सरकारला आवश्यक ते सर्व अधिकार बहाल करणे योग्यच असते.

असे असले तरी मूलभूत हक्कांच्या प्रकरणात मोठ्या प्रमाणात घटना दुरुस्त्या होऊन त्याची व्याप्ती मोठी असली तरी भारतासारख्या खंडप्राय देशात करोडो लोकांना लोकशाही जीवन प्रणाली अनुसरण्याची सुवर्ण संधी या हक्कामुळेच मिळाली आहे. यामुळेच हे मूलभूत हक्काचे प्रकरण म्हणजे "भारतीय लोकशाहीचा मजबूत टिकाऊ असा आधार, सार्वजनिक वर्तणूकीचे नियम सांगणारी एक संहिता व वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करणारा प्रचंड बुरुज किंवा किल्लाच होय." असे एम. व्ही. पायली यांनी या मूलभूत हक्काच्या प्रकरणाचे सुंदर शब्दात वर्णन केलेले आहे.

### ब. भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

(The Fundamental Duties of Indian Citizens) :-

मूलभूत हक्क व कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सुरुवातीस भारतीय संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश केलेला नव्हता. कालांतराने भारतीय जनतेला कर्तव्यांची जाणीव करून देण्यासाठी भारतीय संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करणे भाग पाडले. यासाठी १९७६ साली ४२ वी घटना दुरुस्ती करण्यात आली व रशिया, चीन, पोलंड या देशांकडून मूलभूत कर्तव्यांची प्रेरणा घेऊन भारतीय राज्यघटनेत प्रकरण ४ क मधील कलम ५१ क मध्ये १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला व ३ जानेवारी १९७७ पासून मूलभूत कर्तव्ये अंमलात आली. पुढे २००२ साली ८६ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. मूलभूत



कर्तव्यात आणखी एका मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला. त्यामुळे सध्या मूलभूत कर्तव्यांची संख्या ११ झाली आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत.

क) संविधानाचे पालन करणे आणि त्यांचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

ख) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.

ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे.

घ) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.

ड) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृध्द वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.

छ) वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि प्राणीमात्रांबद्दल दयाबुध्दी बाळगणे.

ज) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

झ) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

त्र) राष्ट्र सतत उपक्रम व सिध्दी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे.

ट) मात्या-पित्याने किंवा पालकांने सहा ते चौदा वर्षादरम्यानचे आपले अपत्य किंवा यथास्थिती पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे.

### क. राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे

(Directive Principles of State Policy) :-

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे सविस्तर विश्लेषण केले असून यासाठी घटनेतील कलम ३६ ते ५१ खर्ची करण्यात आले आहेत. राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वाचे मूळ स्पेनच्या घटनेत सापडते. त्याचे अनुकरण आयरिश रिपब्लीक मध्ये झाले. अमेरिकेच्या स्वातंत्र्य घोषणेशी, फ्रेंच क्रांतीतून उद्‌भलेल्या मानवी अधिकाराच्या उद्‌घोषात आपल्या नीती निर्देशक



Scanned with OKEN Scanner

तत्वाची जवळीक जाणवते. ही तत्त्वे म्हणजे भारतातील कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांना दिलेल्या त्या अधिसूचना आहेत. जी जी मंडळी सत्तेवर येईल त्यांना मनमानी करता येणार नाही. या तत्वांचा त्यांनी मान राखला पाहिजे. आमदार, खासदार व प्रशासकांच्या वर्तणूकीची जणू नियमावली (code of conduct) आहे. ही तत्त्वे उद्देशपत्रिकेत दिलेल्या उद्देशाचे जणू स्पष्टीकरणच आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीयन्याय, विचाराचे, उच्चाराचे, विश्वास आणि श्रद्धेचे स्वातंत्र्य, समता व बंधूभाव स्थापन करण्याचे माध्यम घटनाकर्त्यांनी निवडलेले आहे.

राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे स्पेन,आयर्लंड, सिलोन इ. देशाच्या घटनेतही दिसून येतात. आपल्या राज्यघटनेचे राज्यनीतीची तत्त्वे एक प्रमुख वैशिष्ट्ये होय. लोकशाही परिणामकारक व यशस्वी कार्यान्वीत करावयाची असेल तर त्यासाठी सरकारने कसे वागावे या विषयीचे मार्गदर्शन राज्यनीतीच्या तत्त्वातून सांगण्यात आले आहे. केंद्र व राज्यशासनाने विविध क्षेत्रात कायदे करीत असताना कोणते धोरण स्वीकारावे या बाबतच्या अत्यंत सुंदर सूचना या तत्त्वात देण्यात आल्या आहेत.

जगातील पुढारलेल्या देशात तेथील राज्यघटनेने नागरिकांना जे अधिकार दिले आहेत तसे अधिकार भारतीय घटनेने नागरिकांना दिलेले नाहीत. उदा. बेकारीपासून संरक्षण, वृद्धापकाळात मदत, विश्रांतीचा अधिकार इ. या सर्व अधिकारांची जाणीव भारतीय घटनाकारांना होती. परंतु तत्कालीन आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे त्या सुविधा अशक्य होत्या म्हणून नागरिकांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जा वाढविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीचा समावेश या मार्गदर्शक तत्त्वात करण्यात आला आहे.

भारतीय घटनाकारांना केवळ उच्च आदर्श निर्माण करावयाचा नव्हता तर या आदर्शाचा सद्य परिस्थितीशी मेळ बसविणे आवश्यक होते. फक्त लोकशाही शासन निर्माण करणे एवढेच ध्येय नसून भारतीय नागरिकांची सर्वांगीण उन्नती करणे, त्यासाठी समाजवादी समाज रचना प्रस्थापित करणे हे भारतीय घटनेचे उद्दिष्टे होते. अशी सर्वांगीण उन्नती विशिष्ट वेळेत करता यावी म्हणून निश्चित योजना आखणे आवश्यक आहे. या योजनेचे स्वरुप स्पष्ट करणारी तत्त्वे म्हणजे 'राज्यनीतीची मार्गदर्शक तत्त्वे' होत.

राजकीय लोकशाही ही आर्थिक, सामाजिक लोकशाही शिवाय यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून आर्थिक-सामाजिक लोकशाहीच्या स्थापनेसाठी सांगितलेला



कार्यक्रम म्हणजे मार्गदर्शक तत्त्वे होत. राज्यघटनेच्या चौथ्या भागातील कलम ३६ ते ५१ असे एकूण १६ कलमे या तत्त्वाच्या विवेचनासाठी खर्ची पडलेली आहेत.

कलम ३६ मध्ये 'राज्य' या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

कलम ३७ मध्ये मार्गदर्शक तत्त्वाचे घटनात्मक स्थान स्पष्ट केले आहे "राज्यांनी कायदे करीत असताना या तत्त्वानुसार कायदे करणे राज्याचे कर्तव्य राहील. त्यानुसार देशातील कोणत्याही न्यायालयामार्फत मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी होणार नाही. मात्र देशाचा कारभार चालवितांना ही तत्त्वे मूलभूत समजली जातील व कायदे तयार करीत असतांना या तत्त्वांना प्राधान्य देणे सरकारचे कर्तव्य राहील." डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत भाषण करतांना या तत्त्वाविषयी असे उद्‌गार काढले की, "मार्गदर्शक तत्वे हे दुसरे - तिसरे कांही नसून १९३५ च्या कायद्यान्वये गव्हर्नर जनरल व प्रांताचे गव्हर्नर यांना जे सूचनापत्रक पाठवले जात असे त्याचेच दुसरे नांव होय. दोघात फरक एवढाच की, सूचनापत्रक फक्त कार्यकारी सत्तेला उद्देशून पाठविले जाई तर मार्गदर्शक तत्वांचा उद्देश सरकारला मार्गदर्शन करणे हा असून कार्यकारी मंडळ व विधिमंडळ यांनाही उद्देशून ही तत्त्वे सांगण्यात आली आहेत."

**मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण :-**

राज्यघटनेत राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वाचे सविस्तर विवेचन केले असून यात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, परराष्ट्रविषयक बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. पण घटनेत या तत्त्वाचे तर्कशूध्द वर्गीकरण केले गेले नाही. तरी विविध लेखकांनी आपापल्या परीने याचे वर्गीकरण वा गट पाडलेले आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे चार गटात वर्गीकरण करण्यात आले आहे.

१) सामाजिक तत्त्वे, २) आर्थिक तत्त्वे,
३) राजकीय तत्त्वे ४) आंतरराष्ट्रीय तत्त्वे.

**१) सामाजिक तत्त्वे :-**

समाज सुधारणेसंबंधी सांगितलेल्या तत्त्वांचा या गटात समावेश होतो. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

कलम ३८ (१)



Scanned with OKEN Scanner

राज्य, लोक कल्याणाच्या संवर्धनासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय असेल अशी समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

कलम ३८ (२)

व्यक्ती-व्यक्ती मध्येच नव्हे तर निरनिराळया क्षेत्रामध्ये राहणाऱ्या किंवा निरनिराळया व्यवसायात गुंतलेल्या लोकसमुहात उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी राज्य आटोकाट प्रयत्न करील तसेच दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

कलम ४५

सहा वर्षे पूर्ण होईपर्यंतच्या सर्व बालकांना प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांची तरतूद करण्याकरिता राज्य प्रयत्न करील.

कलम ४६

समाजातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या शिक्षणाची आणि आर्थिक हितसंवर्धनाची राज्य विशेष काळजी घेईल. तसेच सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील.

कलम ४७

आपल्या जनतेचे पोषणमान (आहार दर्जा) व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे यास राज्य आपले प्राथमिक कर्तव्ये मानेल. विशेषत: मादक पेये व आरोग्यास अपायकारक अशी अंमली द्रव्ये यांचे औषधीय प्रयोजनाखेरीज सेवन करण्यावर बंदी आणण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

कलम ४९

संसद कायद्याद्वारे किंवा राष्ट्रीय महत्त्वाचे म्हणून घोषित झालेले कलादृष्ट्या किंवा ऐतिहासिकदृष्टया कुतुहल विषय असलेले प्रत्येक स्मारक, वस्तू यांची लूट, विद्रुपण, नाश, स्थलांतरण, विल्हेवाट किंवा निर्यात यापासून संरक्षण करणे ही राज्याची जवाबदारी असेल.

**२) आर्थिक तत्त्वे :-**

देशाच्या आर्थिक बाबीसंबंधी खालील मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली.

कलम ३९

राज्य हे विशेषत: पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण



आखील-

क) स्त्री-पुरूष नागरिकांना उपजिविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क असावा.

ख) सामूहिक हिताला उपकारक होईल अशा रितीने समाजाच्या भौतिक साधन संपत्तीची मालकी व नियंत्रण यांची विभागणी व्हावी.

ग) सामूहिक हितास बाधक होईल अशाप्रकारे संपत्तीचे व उत्पादन साधनांचे केंद्रीकरण होऊ देऊ नये.

घ) पुरूष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबाबत समान वेतन मिळावे.

ड) स्त्री व पुरूष कामगारांचे आरोग्य आणि ताकद तसेच बालकांचे कोवळे वय यांचा दुरूपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा शक्ती यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरणे भाग पाडू नये.

च) बालकांना निरोगी व मुक्त वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालक व युवक यांना शोषणापासून संरक्षण दिले जावे.

कलम ४१

राज्य आपली आर्थिक क्षमता व विकास विचारात घेऊन कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व अपंगता यांनी पिडीत अशा व्यक्तींच्या बाबतीत आणि काहीही अपराध नसताना हलाखीचे जीवन ज्यांच्या वाटयाला आले आहे अशा लोकांना लोक सहाय्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.

कलम ४२

राज्य हे, कामाबाबत न्याय आणि माणूसकीची परिस्थिती निर्माण करण्यासाठी आणि प्रसूतिविषयक सहाय्यासाठी तरतूद करील.

कलम ४३

राज्य कायद्याद्वारे किंवा अन्य मार्गाने कृषि, औद्योगिक किंवा अन्य प्रकारच्या कामगारांना काम, निर्वाह वेतन उपलब्ध करून देईल. तसेच राहणीमानाचा योग्य दर्जा, विश्रांती आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग यांची खात्री देणारी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी तसेच ग्रामीण क्षेत्रामध्ये वैयक्तिक किंवा सहकारी तत्त्वावर कुटीरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील.



Scanned with OKEN Scanner

कलम ४३ (क)

उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभागी होता यावे यासाठी राज्य कायद्याद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने उपाय योजना करील.

कलम ४८

आधुनिक व शास्त्रीय रीतीने शेती व पशुसंवर्धन यांची योग्य व्यवस्था लावण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. विशेषतः गाई, वासरे, इतर दुभती व जुंपणीची गुरे यांचे जतन करून त्यात सुधारणा करणे आणि त्यांच्या कत्तलीस मनाई करणे याकरिता राज्य उपाययोजना करील.

कलम ४८ (क)

देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

### ३) राजकीय तत्त्वे :-

या तत्त्वांना गांधीवादी तत्त्वे म्हणूनही ओळखली जातात. ती पुढीलप्रमाणे आहेत.

कलम ३९ (क)

राज्य, कायद्याची यंत्रणा राबवितांना समान संधीच्या तत्त्वावर न्यायाची अभिवृध्दी होईल याची निश्चिती करील आणि आर्थिक किंवा अन्य प्रकारच्या दुर्बलतेमुळे कोणत्याही नागरिकाला न्याय मिळविण्याची संधी नाकारली जाणार नाही याची शाश्वती देण्यासाठी कायद्याद्वारे किंवा योजनाद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कायदेविषयक सहाय्य मोफत उपलब्ध करून देईल.

कलम ४०

राज्य ग्रामपंचायती स्थापन करण्यासाठी उपाय योजना करील व त्यांना स्वयंशासनाचे घटक म्हणून काम करण्यासाठी आवश्यक असे अधिकार बहाल करील.

कलम ४४

संपूर्ण भारताच्या राज्यक्षेत्रात नागरिकांसाठी एकसमान नागरी कायदा असावा यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

कलम ५०

राज्यातील न्यायदान यंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवण्यासाठी राज्य उपाययोजना करील.



### ४) आंतरराष्ट्रीय तत्त्वे:-

भारतीय संविधानाच्या कलम ५१ मध्ये आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे नमूद केलेली आहेत.

कलम ५१ (क)

अन्वये राज्य, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

कलम ५१ (ख)

राष्ट्रा-राष्ट्रामध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्ण संबंध राखण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

कलम ५१ (ग)

संघटीत लोकसमुह आपसात व्यवहार करीत असताना त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्यांचा व करारांचा मान राखावा.

कलम ५१ (घ)

राज्य, आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे मिटविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, प्रयत्नशील राहील.

### मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यातील फरक :-

| मूलभूत हक्क | मार्गदर्शक तत्त्वे |
|---|---|
| १) मूलभूत हक्काने देशात राजकीय लोकशाही निर्माण होते. | १) मार्गदर्शक तत्त्वाने देशात आर्थिक व सामाजिक लोकशाही निर्माण होते. |
| २) मूलभूत हक्कांची अंमलबजावणी सक्तीची असून हक्कांसाठी न्यायालयात दाद मागता येते. | २) मार्गदर्शक तत्त्वाचे शासनाने पालन न केल्यास नागरिकांना न्यायालयात दाद मागता येत नाही. म्हणजे अंमलबजावणी सक्तीची नाही |
| ३) मूलभूत हक्क न पाळल्यास त्याच्या संरक्षणाची घटनेतच तरतूद आहे. | ३) मार्गदर्शक तत्त्वे शासनाने न पाळल्यास त्याच्या संरक्षणाची तरतूद घटनेत नाही |
| ४) मूलभूत हक्क हे व्यक्तीचे हक्क | ४) मार्गदर्शक तत्त्वे समाजाचे हक्क |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| आहेत. ते प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी निर्माण केले आहेत. | असून ती राज्याची कर्तव्ये आहेत, ती राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आहेत. |
| ५) मूलभूत हक्क हे व्यक्ती विकासासाठी असून व्यक्तीचे कल्याण करणे हे या हक्काचा उद्देश आहे. | ५) मार्गदर्शक तत्त्वे राज्यांच्या कल्याणासाठी निर्माण केली असून कल्याणकारी राज्यांची निर्मिती करणे हे या तत्त्वाचे उद्दिष्ट आहे. |
| ६) मूलभूत हक्क आणीबाणी जाहीर होताच आणीबाणीच्या काळापुरते कांही हक्क स्थगित होतात. उदा. कलम १९ | ६) मार्गदर्शक तत्त्वाचा अंमल कोणत्याही परिस्थितीत चालू राहतो. |
| ७) मूलभूत हक्क शासनाने काय करु नये हे सांगून व्यक्ती विकासाला गती देतात. | ७) मार्गदर्शक तत्त्वे शासनाने काय करावे हे सांगून समाज विकासाला गती देतात. |
| ८) मूलभूत हक्क फक्त सहाच आहेत. | ८) मार्गदर्शक तत्त्वे अनेक आहेत |
| ९) मूलभूत हक्कांना प्राधान्य देण्यात आले आहे. | ९) मार्गदर्शक तत्त्वांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. |

अशा प्रकारे मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यात फरक सांगता येतो.

**मार्गदर्शक तत्त्वावरील टीका :-**

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी ही तत्त्वे असून कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार करण्यासाठी अत्यंत उपयोगी अशी तत्त्वे आहेत. मात्र या तत्त्वावर चोहोबाजूंनी टीका होत असल्याचे जाणवते. वेगवेगळया विचारवंतानी या तत्त्वावर खालील प्रकारची टीका केली आहे.

१) या तत्त्वाचे पालन न झाल्यास सामान्य नागरिकांना न्यायालयात दाद मागता येत नाही. या तत्त्वाचे पालन केलेच पाहिजे असे बंधन सरकारवर नसल्यामुळे याचा घटनेत समावेश करणे निरर्थक आहे.

२) काही विचारवंताच्या मते, ही तत्त्वे म्हणजे अत्यंत उच्च दर्जाची तत्त्वे भारतीय जनतेसमोर ठेवून श्रध्दाळू व भोळया जनतेला आकर्षित करण्याचा एक प्रयत्न आहे कारण ही तत्त्वे राजकीय नेते जनतेसमोर ठेवून आपल्या मतपेट्या



भरुन घेऊ शकतील. मात्र सामान्य जनतेचे ते कोणतेही हित साधू शकणार नाहीत. म्हणजे ही तत्त्वे राज्यकर्त्यांच्या मर्जीवर अवलंबून असून जेव्हा त्यांची इच्छा होईल तेव्हाच ते अंमलात आणतील अन्यथा नाही. या तत्त्वाविषयी घटना परिषदेत प्रो. के टी शहा यांनी A cheque payable by the bank concerned at its convenience या शब्दात वर्णन केले आहे. मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे असा एक धनादेश आहे, की जो वटविला जावा किंवा नाही हे बँकेच्या मर्जीवर अवलंबून आहे.

३) या तत्त्वावर अशा प्रकारची टीका केली जाते की ही तत्त्वेच घटनेत अनाठायी स्वरुपाचे आहेत. कारण प्रत्येक सरकारचा उद्देशच 'जनतेचे कल्याण करणे' हाच असतो. या तत्त्वानेही जनकल्याणासाठी कोणते मार्ग अनुसरावेत हे सांगितले आहे. असे असताना मार्गदर्शन करण्याचा शक्तीहीन प्रयत्न व्यर्थ आहे.

४) कोणत्याही सार्वभौम सत्तेला मार्गदर्शन करता येत नाही पण या तत्त्वांनी सार्वभौम सत्तेला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. कोणतीही सार्वभौम सत्ता मार्गदर्शनाला बांधील असू शकत नाही.

५) या तत्त्वातील काही तत्त्वाची उपयोगीता संशयास्पद आहे. काही तत्त्वाची अंमलबजावणी करणे अशक्य आहे. उदा. दारूबंदी.

६) या तत्त्वाने भारतीय नागरिकांना पोकळ व अनिश्चित अशी आश्वासने दिली आहेत. यात कामगार - मालक संबंध, नियोजन आदी विषयावर पोकळ विधाने या प्रकरणात करण्यात आली आहेत. तसेच या तत्त्वांचे तर्कशुध्द वर्गीकरण वा रचना करण्यात आलेली नाही. अनेक प्रश्नांची सरमिसळ केल्याची टीका प्रो. एन. श्रीनिवासन यांनी केली आहे.

वरीलप्रमाणे या प्रकरणावर टीका होत असली तरी हे प्रकरण पूर्णत: निरोपयोगी नाही. या तत्त्वांनी काही क्षेत्रात अतिशय उत्कृष्ट कामगिरी बजाविली आहे. राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक व आर्थिक लोकशाही स्थापनेस फार मोठा हातभार या तत्त्वामुळे लागला आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. फक्त कायद्याचा पाठींबा नाही म्हणून या तत्त्वांना निरोपयोगी म्हणता येणार नाही. प्रत्येक कायदयाचा आधार जनमत असते. जनतेनी निवडून दिलेले सरकार या तत्त्वाकडे दूर्लक्ष करून स्वत: अडचणीत सापडणार नाही. तसेच सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास ही तत्त्वे जनतेला उपलब्ध झालेली आहेत. आदर्श नियम म्हणून सरकारच्या वर्तनावर याचा प्रभाव पडतो. म्हणून देशाचे धोरण



Scanned with OKEN Scanner

ठरवितांना ही तत्त्वे अत्यंत मार्गदर्शक ठरतात. ते त्यांचे मार्गदर्शन शासनास दीपस्तंभासारखे आहे. या तत्त्वामुळे कोणत्याही राजकीय पक्षाला अतिरेकी दृष्टीकोन स्वीकारण्यापासून दूर केले जाऊ शकते. या तत्त्वाचे विवेचन घटनेतच देशाचा कारभार चालवितात मूलभूत महत्वाचे नियम अशा शब्दात केलेले आहे. शासन संस्थेच्या सर्वशाखांनी आपले कार्य करतांना ही तत्त्वे डोळयासमोर ठेवली पाहिजेत. न्यायालयांनी सुध्दा याकडे डोळेझाक करू नये. बऱ्याच वेळा निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयांनी या तत्त्वाचा उल्लेख केल्यामुळे याची आवश्यकता निर्विवादपणे सिध्द झालेली आहे. म्हणून न्यायालयासाठी या तत्त्वाचे अस्तित्व दीपस्तंभासारखे आहे असे श्री मोतीलाल सेटलवाड यांनी मत व्यक्त केले आहे. एम. व्ही. पायली यांनी या तत्त्वाचे विश्लेषण करीत असतांना असे म्हटले आहे की, "राज्यनीतिची मार्गदर्शक तत्त्वे भारतातील खऱ्याखूऱ्या लोकशाहीची सर्वात मोठी हमी आहे." (Directive principles stand for the greatest guarantee for a genuine Democracy of India) "ही मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे घटनेच्या उद्देशपत्रिकेचे विस्तृत रुप होय. जनतेला न्याय, समता व बंधुत्व प्रदान करणे हे त्याचे ध्येय आहे" असे श्री मोतीलाल सेटलवाड यांनी या तत्त्वाचे वर्णन केलेले आहे. आर्थिक लोकशाही प्रस्थापित केल्याशिवाय राजकीय लोकशाही अधिक दिवस टिकू शकत नाही. आर्थिक लोकशाहीच्या अभावी राजकीय लोकशाहीचे रुपांतर हुकूमशाहीत होत असते असा आजपर्यंतचा जगाचा इतिहास आहे. या मार्गदर्शक तत्त्वामुळे आर्थिक लोकशाही वृध्दींगत होईल त्यामुळे राजकीय लोकशाही सुध्दा टिकून राहील हा या तत्त्वाचा फार मोठा फायदा आहे.

भारतीय जनतेच्या इच्छा आकांक्षांचे प्रतिबिंब असणारे हे एक नयनरम्य स्वप्न आहे. आज ना उद्या ते साकार होईल या अपेक्षेने या तत्त्वाकडे पाहणे गरजेचे आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

या तत्त्वामुळे अनेक क्षेत्रात प्रगती झाल्याचे आढळते किंवा या तत्त्वांची अंमलबजावणी झाल्यामुळे विकासाला चालना मिळाली आहे. न्याय विभागाला शासन विभागापासून अलग ठेवण्याच्या तत्त्वाचे पालन झाले आहे. तसेच शासनाचा सर्वात लहान घटक म्हणून ग्रामपंचायतीचा स्वीकार केला आहे. देशातील विविध क्षेत्रातील महत्त्वाची उत्पादने शक्यतो खाजगी व्यक्तीच्या हाती दिली नाहीत. वरीच उद्योगधंदे सरकारी मालकीची आहेत. उदा. लोखंड, पोलाद, जहाजबांधणी, खत कारखाना इ. देशातील काही उद्योगक्षेत्रात सध्या खाजगी क्षेत्रास वाव



देण्याचा प्रयास केला जात आहे. सार्वजनिक हितासाठी देशातील बँका व विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. याचा फायदा सामान्य माणसाला मिळाला आहे. शासकीय नोकऱ्या व विविध शिक्षण संस्थामधून मागासलेल्या जाती-जमातींना सोयी सवलती देण्यात आल्या आहेत. त्यांच्यासाठी काही जागा राखून ठेवल्या जातात. जमीनदारी नष्ट केली आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. याचा फायदा अनेकांना मिळालेला आहे. दारूबंदीच्या धोरणावर सुध्दा भर दिला जात आहे. काही काही राज्यांनी पूर्णपणे दारूबंदी लागू केली आहे. आर्थिक क्षेत्रात कामगारांचे शोषण होऊ नये म्हणून विविध कायदे पास केले आहेत. मिनिमम वेजेस ॲक्ट, फॅक्टरी ॲक्ट, गुमास्ता ॲक्ट इत्यादी मंजूर करून कामाचे तास, रजेचे दिवस, विश्रांतीची वेळ, जादाकामासाठी मोबदला, किमान वेतन, स्त्री मजूरांना प्रसुतीच्या वेळी रजा, स्त्री पुरूषांना समान कामांसाठी समान वेतन व १४ वर्षाखालील मुलांना अवघड कामास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच भारताचे परराष्ट्र धोरण पूर्णपणे याच तत्त्वांवर आधारलेले आहे. म्हणून आपणास असे म्हणता येईल को, बऱ्याच मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी होऊन त्यांचा लाभ सामान्यांना होत असल्याचे आढळते.

थोडक्यात मार्गदर्शक तत्त्वाची अंमलबजावणी करीत असतांना मूलभूत हक्काचा अडसर येत असल्यामुळे २५ व्या व ४२ व्या घटनादुरूस्तीने त्यात बदल करून 'घटनेच्या भाग चार मध्ये सांगितलेल्या तत्वाची अंमलजावणी करण्यासाठी करण्यात आलेला कोणताही कायदा मूलभूत हक्काच्या विरोधात जातो म्हणून न्यायालयातून रद्द ठरविला जाऊ शकणार नाही. अशी तरतूद केली यामुळे या तत्त्वाच्या अंमलबजावणीला मूलभूत हक्कापेक्षा श्रेष्ठ स्थान दिले आहे. म्हणून या तत्त्वाची अंमलबजावणी होणार नाही असे म्हणता येणार नाही किंवा या म्हणण्याला कांहीच अर्थ नाही.

◆◆◆◆◆



Scanned with OKEN Scanner